महिला व बाल कल्याण विभागामार्फत ग्रामिण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील (सर्वसाधारण, संवर्गातील) महिलांना मोफत पीठाची गिरणी / शेवया मशिन साहित्य मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना व आवश्यक कागदपत्रांची माहिती.

- -

अर्जदाराचा पासपोर्ट साईज फोटो		कार्यालयीन उपयोगासाठी

प्रति,

गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, - - - - - - - -

विषयः- पीठाची गिरणी / शेवया मशिन मंजूरी बाबत...

अर्जदारः- श्रीमती. *(पुर्ण नांव)* -
गांव - - - - - - - - - - ता. - - - - - -जिल्हा अहमदनगर.

महोदय,

जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समितीच्या मार्फत सन २०१३-२०१४ मध्ये *पीठाची गिरणी / शेवया मशिन* साहित्य यांचे वाटप होणार आहे. असे मी गावांत प्रसिध्द झालेल्या जाहिर सुचना द्वारे / दवंडीद्वारे समजलेवरुन मी हा अर्ज मला *पीठाची गिरणी / शेवया मशिन* साहित्य मंजूर करण्यासाठी करीत आहे. अर्जासोबत पुढील प्रमाणे कागदपत्रे सादर करीत आहे.

१) वार्षिक उत्पन्नाचा मा.तहसिलदार / कामगार तलाठी / ग्रामसेवक यांचा दाखला.*(वार्षिक उत्पन्न रू.३२,०००/- वा त्या पेक्षा कमी असणारे लाभार्थी हेच पात्र आहेत)*
२) दारिद्र्य रेषेखालील असल्यास कार्ड सादर करावे.
३) लाभार्थी तपशिलवार माहिती दर्शविणारे कुटूंबाचा दाखला.
४) लाभार्थीचा जबाब व करारनामा.
५) यापुर्वी महिला व बालकल्याण समितीच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतला नसल्याबाबतचे ग्रामसेवकाचे प्रमाणपत्र.
६) ग्रामपंचायतीचे स्थानिक रहिवाशी असले बाबतचा दाखला.

या द्वारे असे हमीपत्र देते किं, वर नमूद केलेल्या कागदपत्राची माहिती सत्य आहे व या पुर्वी या योजनेचा फायदा मला शासनाच्या / जिल्हा परिषदेच्या कोणत्याही खात्याकडून मिळालेला नाही. या योजनेमध्ये काही फसवणूक केल्याचे निष्पन्न झाल्यास माझा अर्ज रद्द करून दप्तरी दाखल करण्यास माझी हरकत नाही. तसेच प्रकरण सादर केले म्हणून ते मंजूर झाले असे नाही याची मला पुर्ण जाणीव आहे.

स्थळः-
दिनांक :- अर्जदाराची सही.

ग्रामसेवक यांनी पाहावयाच्या बाबी.

१) अर्जदारानी या पुर्वी महिला व बाल कल्याण विभागाच्या योजनेचा लाभ घेतला आहे काय? होय/नाही.
२) असल्यास त्याचे वार्षिक उत्पन्नात वाढ झाली आहे काय? होय/नाही.
३) अर्जदार योजनेचा लाभ घेणेसाठी पात्र आहे काय? होय/नाही.
४) अर्जदाराच्या कुटुंबातील कोणती व्यक्ती शासकीय अथवा निमशासकीय सेवेत आहे किंवा नाही? होय/नाही.
५) ग्रामपंचायत कार्यालयाची शिफारस- ग्रामसेवक

ग्रामसेवक ----------
ग्रामपंचायत ----------
तालुका ----------

---

(३)

अर्जदार ज्या परिषद गटातील आहे त्या सन्माननीय सदस्याची शिफारस

जिल्हा परिषद सदस्य स्वाक्षरी

(४)

गट विकास अधिकारी पंचायत समिती कार्यालयाचे अभिप्राय.